**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वाशिम यांनी दिनांक १०/०६/२०२० रोजी सकाळी ११.३० वा झालेल्या आढावा सभेचे इतिवृत्त**

**सभेचे स्थळ- सभागृह (क्र.२) जि.प. वाशिम**

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वाशिम यांचे अध्यक्षते खाली सभा दिनांक १०/०६/२०२०. रोजी सकाळी ११.३० वा आयोजीत करण्यात आली सदर सभेला खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थितीत होते.

१. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वाशिम<br>
२. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वाशिम<br>
३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं), जि.प.वाशिम<br>
४.सबंधीत यंत्रणा व सर्व खाते प्रमुख,

यांचे उपस्थितीत जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत, आरोग्य , तालुका स्तरीय BRC-CRC, महा.गांधी रा.ग्रा.रो.ह.योजनेचे तालुकास्तरीय APO तसेच आपले सरकार सेवा केंद्राचे तालुका व्यवस्थापक यांची आढावा सभा सपंन्न झाली.

सभेत विषयवार झालेल्या चर्चेनुसार इतिवृत्त खालील प्रमाणे-

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय</th><th>कार्यवृत्तांत</th></tr>
<tr><td>१.</td><td>स्वच्छ भारत मिशन अंतर्गत LOB, NLOB बांधकामाची स्थिती तसेच अखर्चीत निधीचा आढावा</td><td>पंचायत समिती, वाशिम, मालेगांव, मंगरुळपीर, रिसोड , मानोरा व कारंजा<br>स्वच्छ भारत मिशन अंतर्गत NOLB शौचालयाचे उर्वरीत उद्दिष्ट दि.२० जुन २०२०. पर्यंत कोणत्याही परिस्थितीत १०० टक्के पुर्ण करावे तसेच बांधकाम<br>झालेल्या शौचालयाचे फोटो त्वरीत अपलोंड करावेत या पुर्वी पुर्ण झालेल्या शौचालयाचा निधी जिल्हा स्तरावरुन वितरीत करण्यात यावा अशा सुचना सर्व गविअ व वि.अ.पं.यांना मा.मु.का.अ.यांनी दिल्या.</td></tr>
<tr><td>२</td><td>मजुर उपस्थिती वाढविणे.</td><td>यावेळेस वाशिम जिल्हयातील मजुर उपस्थिती माहे जुन मध्ये ७००० ते ८००० राहते.ती आज दि.१०.०६.२०२० रोजी खालील प्रमाणे आहे.
<table>
<tr><th>अ.क्र</th><th>तालुका</th><th>ग्रा.पं. संख्या</th><th>कामे सुरु असलेल्या ग्रा.पं.संख्या</th><th>कामावर उपस्थित मजुरांची संख्या</th><th>सुरु कामाची संख्या</th></tr>
<tr><td>१</td><td>कारंजा</td><td>९१</td><td>१०</td><td>११९</td><td>१८</td></tr>
<tr><td>२</td><td>मालेगाव</td><td>८३</td><td>१०</td><td>९९</td><td>२५</td></tr>
<tr><td>३</td><td>मंगरुळपीर</td><td>७६</td><td>१६</td><td>५३१</td><td>३८</td></tr>
<tr><td>४</td><td>मानोरा</td><td>७७</td><td>३५</td><td>४४६</td><td>९५</td></tr>
<tr><td>५</td><td>रिसोड</td><td>८०</td><td>७</td><td>६६</td><td>२३</td></tr>
<tr><td>६</td><td>वाशिम</td><td>८४</td><td>२५</td><td>६४५</td><td>६४</td></tr>
<tr><td colspan="2">एकुण</td><td>४९१</td><td>१०३</td><td>१९०६</td><td>२६३</td></tr>
</table>
आज रोजी ग्रा.पं.स्तरावर १९०६ एवढीच मजुर उपस्थिती असुन ती फार कमी आहे. येणा-या दिवसामध्ये प्रत्येक ग्राम पंचायत मध्ये कामे सुरु करुन मजुर उपस्थिती वाढवावयाची आहे त्या दृष्टीने प्रत्येक गविअ यांनी आपल्या स्तरावर योग्य ते नियोजन करण्यात यावे. प्रत्येक गविअ यांनी सन २०२०-२१ या चालु वर्षाचे लेबर बजेट मध्ये किती कामे प्रस्तावीत करण्यात आली, त्या कामाची सद्यस्थिती काय आहे किती कामांना तांत्रिक प्रशासकीय मान्यता दिलेल्या आहेत,अपुर्ण कामे किती आहेत,किती ग्राम पंचायतमध्ये कामे सुरु झालेली नाहीत,कामे सुरु करायला काय अडचणी आहेत अशी विचारणा करण्यात आली.<br>गट विकास अधिकारी वाशिम यांनी वाशिम पंचायत समिती अंतर्गत एकुण ८४ ग्राम पंचायती असुन यावर्षीच्या मंजुर लेबट प्रमाणे ४६ कामांना प्रशासकीय मंजुराती दिलेल्या आहेत असे सांगितले. ८४ ग्राम पंचायत पैकी ८ ग्राम पंचायत मध्ये अद्याप पर्यंत एकही</td></tr>
</table>

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | काम सुरु नसल्याचे सांगितले. गविअ वाशिम यांनी मजुराची मागणी नसल्यामुळे मजुर उपस्थिती कमी असल्याचे सांगितले.यावर मा.मु.का.अ यांनी मजुराची काम मागणी नसेल तर लेखी कळविण्यात यावे. आपला लेखी अहवाल शासनास कळविण्यात येईल असे सांगितले. तसेच सर्व ग्राम पंचायत मध्ये तात्काळ कामे सुरु करुन मजुर उपस्थिती वाढविण्याबाबत सक्त सुचना दिल्या.<br>गट विकास अधिकारी मालेगांव यांना मजुर उपस्थिती कमी असल्याबाबत विचारणा केली असता,पुढील आठवडयात मजुर उपस्थिती वाढविण्यात येईल असे सांगितले. परंतु मजुर उपस्थिती कशा प्रकारे वाढेल याबाबतचे नियोजन सांगितले नाही.पंचायत समिती मालेगांव अंतर्गत एकुण ८३ ग्रा.पं.पैकी फक्त १० ग्रा.पं.मध्ये कामे सुरु असुन त्यावर ९९ मजुर उपस्थित असल्याचे दि.१०.०६.२०२० रोजीच्या अहवालावरुन दिसुन येते.एकुण ८३ ग्रा.पं.पैकी २९ ग्रा.पं.मध्ये एकही काम सुरु नसल्याचे दिसुन आले.तसेच सन २०२०-२१ च्या लेबर बजेट मधील कामांना एकही प्रशासकीय मान्यता दिली नसल्याचे दिसुन येते.यावर गविअ मालेगांव यांनी कुठल्याच प्रकारचे उत्तर दिले नाही.तसेच दिलेल्या सुचनानुसार व कर्तव्य जबाबदारी नुसार गविअ मालेगाव व अधिनिस्त कर्मचारी कामे करित नसल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात देण्याचे निर्देश देण्यात आले.कार्यरत कर्मचा-यापैकी सर्वात जुने श्री. विजय सरनाईक यांना यापुर्वी मजुर उपस्थिती कशी राहत होती याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्याबाबत कोणतेही उत्तर न देता सभागृहाच्या शिस्तीचा भंग करण्यासारखी वतुणुक केली त्याबाबत त्यांच्या सेवा समाप्त का करण्यात येऊ नये याबाबत नोटीस देण्याचे निर्देश द्रेण्यात आले एंकदरीत गट विकास अधिकारी यांचे कामकाज समाधान कारक नसल्याने त्यांना कामकाजाबाबत अर्धशासकिय पत्र देण्याचे निर्देश देण्यात आले.<br>गविअ रिसोड यांनी मजुर उपस्थिती कमी असल्याबाबत फक्त घरकुलाचे कामे सुरु असल्याचे सांगितले. यावर मा.मु.का.अ.यांनी बाकी कामे का सुरु नाहीत याबाबत विचारणा केली तर गविअ यांनी पुढील आठवडयात कामे सुरु मजुर उपस्थिती वाढविण्यात येईल असे सांगितले. रिसोड पंचायत समिती अंतर्गत एकुण ग्रा.पं.पैकी २८ ग्रा.पं.मध्ये कामे सुरु नसल्याचे विचारले असता गविअ रिसोड यांना त्या ग्रा.पं.मध्ये कामे सुरु करण्याबाबत नियोजन करण्यात आले असल्याचे सांगितले. परंतु आजपर्यंत करण्यात आलेल्या कामाबाबत नाराजी व्यक्त करत तालुक्यामध्ये काम होत नसल्याचे सांगितले. तसेच विस्तार अधिकारी (पं) श्री.पळसकर व APO/PTO यांनी दररोज सायंकाळी ०५.३० वा.दिवस भरात केलेल्या कामाचा आढावा जिल्हा कार्यालयात उपस्थित राहुन देण्याबाबत निर्देश देण्यात आले.<br>गविअ कारंजा,मानोरा,मंगरुळपीर या यांना मजुर उपस्थिती कमी असल्याबाबत विचारणा केली असता, पुढील दोन दिवसात मजुर उपस्थिती मध्ये वाढ होईल असे सांगितले. अनुक्रमे कारंजा मध्ये १० ग्रा.पं.मध्ये १८ कामावर ११९ मजुर तसेच मानोरा मध्ये ३५ ग्रा.पं.मध्ये ९५ कामावर ४४६ मजुर व मंगरुळपीर मध्ये १६ ग्रा.पं.मध्ये ३८ कामावर ५३१ मजुर आज रोजी उपस्थित असल्याचे दिसुन आले.तसेच अनुक्रमे कारंजा मध्ये १२ ग्रा.पं.मानोरा मध्ये १४ ग्रा.पं.व मंगरुळपीर मध्ये ८ ग्रा.पं.अद्याप एकही काम सुर नसल्याचे दिसुन येते. यावर काम सुरु नसलेल्या ग्रा.पं.मध्ये तात्काळ कामे सुरु करुन आज पासुन किमान माहे जून अखेर पर्यत प्रति तालुका किमाण १००० मजुर उपस्थिती राहील या बाबत चे नियोजन करण्यात यावे व मजुर उपस्थित ठेवावे अशा सक्त सुचना दिल्या. |
| ३ | अपुर्ण कामे पुर्ण करणे | ग्रा.पं.स्तरावरील एकुण ७०७३ कामे अपुर्ण असल्याचे दिसुन आले त्यामध्ये कारंजा १०९१,मालेगांव १७६७,मंगरुळपीर ७५९,मानोरा ११०३,रिसोड १५८५,वाशिम ७६८ असे एकुण ७०७३ कामे अपुर्ण असल्याचे दिसुन येतात यावर महोदयांनी एवढया मोठया प्रमाणात अपुर्ण कामे का आहेत अशी विचारणा केली असता गविअ यांनी एकुण अपुर्ण कामामध्ये घरकुलाची कामे प्रत्येक तालुक्यामध्ये मोठया प्रमाणावर असल्याचे सांगितले. यावर ज्या घरकुलाची कामे पुर्ण झालेली आहेत त्यांच्या cc करण्यात याव्यात तसेच बाकी |

Scanned with CamScan

| | | |
|---|---|---|
| | | जी अपुर्ण कामे आहेत ती तात्काळ पुर्ण करण्यात यावे अशा सक्त सुचना दिल्या. |
| ४ | **Rejected Transaction** | वाशिम जिल्हयातील सन २०१९-२० मधील एकुण Rejected Transaction ची संख्या ४८३ असल्याचे दिसुन येते यामध्ये कारंजा २४,मालेगाव ९६,मंगरुळपीर ४५,मानोरा १५३,रिसोड १०६,वाशिम ५९ असे एकुण ४८३ Rejected Transaction प्रलंबित आहेत याबाबत मा.मु.का.अ.यांनी विचारले असता गविअ यांनी Inactive Aadhar व No such Account मुळे प्रलंबित असल्याचे सांगितले यामध्ये यावर मा.मु.का.अ.यांनी पुढील सात दिवसात सर्व तालुक्यांनी Rejected Transaction क्लीअर करावे अशा सक्त सुचना दिल्या. |
| ५ | **Active मजुरांचे आधार क्र. संकेतस्थळावर नोंदविणे** | वाशिम जिल्हयात एकुण १२१६१५ एवढी Active मजुरांची संख्या असुन त्यापैकी १०२७०२ Active मजुरांचेच आधार क्र.नरेगा संकेतस्थळावर नोंदविले असुन याची टक्केवारी ८४.४५% एवढी आहे याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.व १०० % Active मजुरांचे आधार क्र.संकेतस्थळावर का नोंदविण्यात आली नाहीत अशी विचारणा केली असता गविअ वाशिम यांनी Active मजुरांचे आधार क्र. संकेतस्थळावर नोंदविण्याचे काम सुरु असुन एकुण Active मजुरा पैकी ८०४ Active मजुरांचे आधार क्र. नोंदविणे बाकी असुन ते पुढील आठ दिवसात नोंदविण्यात येऊन Active मजुरांचे आधार क्र. नोंदविल्याचे प्रमाण १००% करण्यात येईल असे सांगितले.<br>गविअ मालेगांव यांनी Active मजुरांचे आधार क्र. संकेतस्थळावर नोंदविण्याचे काम सुरु असल्याबाबत सांगितले. परंतु मालेगांव पंचायत समिती Active मजुरांचे आधार क्र. नोंदविण्याचे प्रमाण हे केवळ ६६.५ असल्याचे दिसुन येते यावर मा.मु.का.अ.यांनी सांगितले की उप मु.का.अ.(पं) व गविअ (नरेगा) यांनी आपल्या तालुक्यात येउन ग्राम सेवक यांचे आढावा सभा घेतल्यानंतरही मागील एका महीन्यापासुन Active मजुरांचे आधार क्र. नोंदविण्याचे प्रमाण केवळ ६६% कसे याचा अर्थ आपल्या तालुक्यात काम होत नसल्याचे आले . याबाबत पुढील ७ दिवसामध्ये सर्व उर्वरित आधार जमा करुन ते ऑनलाईन करण्याबाबत सक्त सुचना देण्यात आल्यात.<br>गविअ रिसोड यांना वरिल विषयी विचारले असता एकुण Active मजुरापैकी २९९० Active मजुरांचेच आधार नं.नोंदविणे बाकी असुन पुढील आंठ दिवसात Active मजुरांचे आधार नं. नोंदविण्याचे काम १००% करण्यात येईल असे सांगितले.<br>गविअ कारंजा,मानोरा,मंगरुळपीर यांना वरिल विषयाबाबत एकुण Active मजुरापैकी बाकी असलेल्या Active मजुरांचे आधार क्र. संकेतस्थळावर नोंदविण्याचे काम पुढील आठ दिवसात करण्यात येईल असे सांगितले.सर्व गविअ यांना सक्त सुचना दिल्या कि, Active मजुरांचे आधार क्र.पुढील आठ दिवसात १००% नोंदविण्यात यावे. |
| ६ | **Job Card Verification** | वाशिम जिल्हयातील एकुण ६६९५३ Active कुटुंब असुन ६३११९ Active कुटुंबाचे Job Card Verification करण्यात आले असुन त्याची टक्केवारी ९४.३८% एवढी आहे. याबाबत विचारणा केली असता पंचायत समिती मालेगांव वगळता सर्व गविअ यांनी पुढील आठ दिवसात Job Card Verification १००% करण्यात येईल असे सांगितले.<br>तसेच वाशिम जिल्हया मध्ये कोव्हीड च्या प्रादुभावामुळे जिल्हयात जवळपास ४०००० मंजुर परत आले त्यांना जॉब कार्ड वितरीत करणे बाबत विचारणा केली असता कोणत्याही पंचायत समितीजवळ याबाबत निश्चित आकडेवारी नसल्याचे आढळुनआले यावर आपणांस नरेगा विभागामार्फत देण्यात आलेल्या पत्रानुसार व गावामध्ये परत आलेल्या सर्व मजुराचे सर्व PTO यांनी रोजगार सेवक व ग्रामसेवक यांचेमार्फत माहीती घेऊन प्रत्येक गांवनिहाय आलेल्या मजुरापैकी किती मजुरांना यापुर्वीची Job Card दिलेले आहे , कितीना दयावयाचे आहे याबाबत माहिती घेऊन ज्यांच्या Job Card कार्ड नाहीत अशा मजुरांना Job Card वाटप करावे जे मजुर Job Card घेण्यास नकार देतील त्यांच्या यादी करुन सर्व मजुरांना Job Card वितरीत करुन त्याबाबतची संपुर्ण माहिती ७ दिवसाचे आंत सादर करणे बाबत निर्देश देण्यात आले. |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ७ | Timely Payment | वाशिम जिल्हयातील Timely Payment सद्यस्थितीत ९९.१६% असुन ते १००% कसे राहील याबाबत सर्व तालुक्यांनी दक्षता घ्यावी असे मा.मु.का.अ यांनी सांगितले.तसेच हजेरी पत्रकाचा कालावधी संपल्यानंतर पुढील आठ दिवसात प्रत्येक हजेरी पत्रकाची अदायगी करण्यात यावी अशा प्रकारच्या सक्त सुचना सर्व तालुकास्तरीय अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात आल्या. |
| ८ | ५% दिव्यांग कल्यान निधी पं.स. व ग्रा.पं. स्तर सन-२०१९-२० खर्चा बाबत आढावा | **पंचायत समिती, वाशिम, मालेगांव, मंगरुळपीर, रिसोड , मानोरा व कारंजा**<br>सन-२०१९-२० या वर्षातील ५% दिव्यांग कल्याण निधी पं.स.स्तर तरदुती नुसार योजना राबुन निधी खर्च करण्या साठी प.स.सभागृहाची मान्यता आवश्यक आहे. परंतू मागील वर्षी जिल्हयात पं.स.व जि.प.निवडणुकीची आचार संहिता असल्यामुळे सदर योजना राबविता आली नाही. त्यामुळे निधी अखर्चीत राहीला असे गविअ वाशिम यांनी सांगीतले. त्या अनुषंगाने उक्त प्रकरणी योजना न राबविल्यामुळे पं.स.स्तरावरील अखर्चीत राहिलेला निधी जि.प.स्तरावर तात्काळ वर्ग करण्यात यावा अशा सुचना सर्व गविअ यांना मा.मु.का.अ.यांनी दिल्या. |
| ९ | ग्रा.पं.कर मागणी रजिष्टर आद्यावत करणे | **पंचायत समिती, वाशिम, मालेगांव, मंगरुळपीर, रिसोड , मानोरा व कारंजा**<br>ग्रा.पं.कर मागणी रजिष्टर नमुना नं.९ आद्यावत करण्या बाबत सर्व वि.अ.पं.यांना सुचना दिल्या व करमागणी अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करण्यात यावा अशा सुचना मा.मु.का.अ.यांना दिल्या. |
| १० | ई-ग्राम स्वॉफ्ट वर नमुना नं. ८ व इतर नमुने ऑनलाईन करणे | **पंचायत समिती, वाशिम, मालेगांव, मंगरुळपीर, रिसोड , मानोरा व कारंजा**<br>ग्रा.पं.कर आकारणी रजिष्टर नमुना नं.८ मधील नोंदी ई-ग्रामसॉफ्ट मध्ये नोंदी १० दिवसाचे आत करण्या बाबत सर्व केंद्र चालकांना व तालुका व्यवस्थापकांना सुचना दिल्या. तसेच ग्रा.पं.सर्व १ ते ३३ नमुने ई-ग्रामसॉफ्ट मध्ये अद्यावत करण्या बाबत सुचना दिल्या. तसेच जिल्हा व्यवस्थापक ASSK व अधिक्षक पंचायत विभाग यांनी पं.स.स्तरावर गविअ यांना सोबत घेवुन बैठका आयोजीत करण्यात याव्यात अशा सुचना दिल्या. तसेच १५ वा वित्त आयोगाचा निधी PFMS प्रणाली द्वारे मिळणार आहे , तसेच खर्च सुधा करावे लागणार आहे. त्या बाबत ग्रा.पं.ची नोंदणी PFMS प्रणालीवर करण्याकरीता ज्या ग्रा.पं.चे बँक खाते राष्ट्रीयकृत नाहीत त्यांनी राष्ट्रीयकृत बॅकेतच खाते काढुन करणे आवश्यक आहे. या करीता सर्व ग्रा.पं.सचिव व सरपंच यांची Organization पध्दतीची DSC काढुन त्यांची नोंदणी PFMS प्रणालीवर करणे. सदर प्रणालीवर आर्थिक व्यवहार करण्यासाठी तसेच DSC ची नोंद कण्यासाठी मागील दिवसाचे प्रिया सॉफ्ट Day Book क्लोज असणे अनिवार्य आहे. तसेच ज्या ग्रा.पं.ची मुदत संपत आलेली आहे. अशा ग्रा.पं.च्या सरपंचाची DSC काढण्याची घाई करु नये. अशा सुचना मा.अति.मु.का.अ.यांनी दिल्या |
| ११ | ASSK केंद्राची अग्रीम राशी जमा करणे बाबत आढावा | **पंचायत समिती, वाशिम, मालेगांव, मंगरुळपीर, रिसोड , मानोरा व कारंजा**<br>ASSK केंद्राची अग्रीम राशी व बाकी असलेली रक्कम जमा करणे बाबत सभेत मा.अति.मु.का.अ.यांनी सुचना दिल्या |
| १२ | कलम ३९(१) अंतर्गत प्रकरणाचा व मा. विभागीय आयुक्त यांनी पारित आदेशांचे अनुपालन करणे | **पंचायत समिती, वाशिम, मालेगांव, मंगरुळपीर, रिसोड , मानोरा व कारंजा**<br>मा.वि.आयुक्त अमरावती यांचे पारित आदेशानुसार अनुपालन सादर करावे अशा सुचना मा.मु.का.अ. यांनी सर्व गविअ व वि.अ.(पं) यांना दिल्या. |
| १३ | १४ वा वित्त आयोग अखर्चीत व व्याजाच्या निधीचा आढावा | **पंचायत समिती, वाशिम, मालेगांव, मंगरुळपीर, रिसोड , मानोरा व कारंजा**<br>१४ वा वित्त आयोग अखर्चीत निधी बाबत ३० जुन २०२० पर्यंत खर्च करावा व व्याजाची रक्कम पं.स.स्तरावर जमा करावा. तसेच १३ वा वित्त आयोगाचे बँक खाते बंद करुन पं.स.स्तरावर रक्कम जमा करावी. तसेच १५ वित्त आयोग सुरु करण्या पुर्वी १४ वा वित्त आयोगाचे बॅक खाते बंद करण्यात यावे. अशा सुचना मा.मु.का.अ.यांनी सर्व गविअ व वि.अ.पं.यांना दिल्या. |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| १४ | निलंबीत ग्रामसेवक/ग्राविअ यांचे विरुध्द दोषारोप पत्र दाखल करणे | **पंचायत समिती, मालेगांव, मानोरा अंतर्गत**<br>निलंबीत असलेल्या ग्रामसेवक/ग्राविअ यांचे विरुध्द खाते चौकशी सुरु करण्याकरिता तात्काळ प्रपत्र १ ते ४ दोषारोप पत्रासह सादर करण्या बाबत च्या सुचना मा.मु.का.अ.यांनी सर्व सर्व गविअ व वि.अ.पं. यांना दिल्या. |
| १५ | ग्रामसेवक/ग्राविअ यांचे सेवानिवृत्ती प्रकरणे निकाली काढणे | **पंचायत समिती, वाशिम, मालेगांव, मंगरुळपीर, रिसोड , मानोरा व कारंजा**<br>ग्रामसेवक/ग्राविअ यांचे सेवानिवृत्ती / कटूंब निवृत्ती वेतन प्रकरणे, मालेगांव-०२ , मानोरा-०५ , मंगरुळपीर-०१ , वाशिम- २ , त्वरीत निकाली काढणे बाबत कार्यवाही करण्यात यावी. अशा सुचना सर्व सबंधीत गविअ यांना दिल्या. |
| १६ | ग्रामपंचायत अफरातफर प्रकरणे निकाली काढणे बाबत. | **१. पंचायत समिती, वाशिम**<br>पं.स.स्तरावरील एकुण ९५ प्रकरणा पैकी ३९ प्रकरणे खारीज करण्यात आले असून ५६ प्रकरणे पं.स.स्तरावर प्रलंबीत आहेत. त्यावर मा.मु.का.अ यांनी अशासुचना दिल्या की, प्रलंबीत सर्व प्रकरणाचे अनुपालन तात्काळ सादर करावेत.<br>**२. पंचायत समिती, मालेगांव**<br>पं.स.स्तरावरील एकुण ६० प्रकरणा पैकी ०४ प्रकरणे खारीज करण्यात आले असून ५६ प्रकरणे पं.स.स्तरावर प्रलंबीत आहेत. त्यावर मा.मु.का.अ यांनी अशासुचना दिल्या की, प्रलंबीत सर्व प्रकरणाचे अनुपालन तात्काळ सादर करावेत.<br>**३. पंचायत समिती, मंगरुळपीर**<br>पं.स.स्तरावरील एकुण ६६ प्रकरणा पैकी १६ प्रकरणे खारीज करण्यात आले असून ५० प्रकरणे पं.स.स्तरावर प्रलंबीत आहेत. त्यावर मा.मु.का.अ यांनी अशासुचना दिल्या की, प्रलंबीत सर्व प्रकरणाचे अनुपालन तात्काळ सादर करावेत.<br>**४. पंचायत समिती, रिसोड , मानोरा व कारंजा**<br>**पं.स.रिसोड** स्तरावरील एकुण ६६ प्रकरणा पैकी १३ प्रकरणे खारीज करण्यात आले असून ५३ प्रकरणे पं.स.स्तरावर प्रलंबीत आहेत.<br>**पं.स.मानोरा** स्तरावरील एकुण १०० प्रकरणा पैकी ४४ प्रकरणे खारीज करण्यात आले असून ५६ प्रकरणे पं.स.स्तरावर प्रलंबीत आहेत.<br>**पं.स.कारंजा** स्तरावरील एकुण १३२ प्रकरणा पैकी २४ प्रकरणे खारीज करण्यात आले असून १०८ प्रकरणे पं.स.स्तरावर प्रलंबीत आहेत.<br>त्यावर मा.मु.का.अ यांनी अशा सुचना दिल्या की, प्रलंबीत सर्व प्रकरणाचे अनुपालन तात्काळ सादर करावेत. |
| १७ | ग्रामपंचायत सखोल निरिक्षण बाबत आढावा | **पंचायत समिती, वाशिम, मालेगांव, मंगरुळपीर, रिसोड , मानोरा व कारंजा**<br>सर्व पं.स. ला गविअ यांना सखोल-२४ साधारण- ९६ एकूण १२० तसेच विस्तार अधिकारी पं. यांना सखोल-१२० अशा प्रमाणे ठरवुन दिलेल्या वार्षिक उद्दिष्टा नुसार दर महा १० ग्रा.पं.चे निरक्षणे प्रमाणे गविअ व वि.अ.पं. यांनी ग्रा.पं.सखोल निरीक्षणे अनुषेशासह पुर्ण करावेत. अशा सुचना मा.मु.का.अ.यांनी दिल्यात. |
| १८ | ग्रामपंचायत वार्षिक प्रशासन अहवाल | **पंचायत समिती, वाशिम, मालेगांव, मंगरुळपीर, रिसोड , मानोरा व कारंजा**<br>ग्रा.पं.वार्षिक प्रशासन अहवाल दिनांक ३० जुन २०२०. पर्यंत पंचायत विभागत सादर करावा अशा सुचना मा.मु.का.अ.यांनी सर्व वि.अ.(पं.)यांना दिल्या. |
| १९. | पाणी टंचाई निवानार्थ सद्यस्थिती बाबत आढावा | **पंचायत समिती, वाशिम, मालेगांव, मंगरुळपीर, रिसोड , मानोरा व कारंजा**<br>जिल्हातील पाणी टंचाई बाबत सर्व पं.स.मधील विहीर अधिग्रहण व टँकर लावलेल्या गांवाची संख्येची माहिती व सद्यस्थीतीत पाणी टंचाई बाबत सभेत माहिती उप अभियंता श्री.निलेश राठोड ग्रा.पा.पु.विभाग यांनी दिली. पाणी गुणवत्ता समिती मध्ये व ग्रा.पं.सभेमध्ये पिण्याच्या पाण्याच्या क्लोरिन बाबत चर्चा करण्याचे निर्देश दिले व ज्या ग्रा.पं.मध्ये २०% पेक्षा कमी क्लोरीन आढळलेल्या ग्रा.पं.वर कार्यवाही करण्याच्या सुचना मा.मु.का.अ.यांनी दिल्या. |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| २०. | **कोव्हीड-१९ अंतर्गत ग्रामपंचायतीने केलेल्या कामांचा आढावा** | **पंचायत समिती, वाशिम, मालेगांव, मंगरुळपीर, रिसोड , मानोरा व कारंजा**<br>जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी कोव्हीड-१९ च्या संसर्ग/ प्रसार रोखण्याकरीता होमक्वॉरंटांईन व इतर बाबतीत सुचनाचे तंतोतंत पालन करावे.अशा सुचना दिल्या तसेच प्रत्येक सर्कल करीता रुपये ५०,०००/- मिळाले त्या मधुन १० टक्के खर्च ३ लेअर असलेले मॉस खरेदी बचत गटाकडून करता येईल. तसेच सर्व जि.प.शाळा, इमारती २६ जुन पुर्वी निरजंतुकिकरण कराव्यात. व स्वच्छता सफाई कामगारांना २२०/- रुपये प्रती दिन प्रमाणे ६०००/- महिना देता येईल. तसेच प्रा.आ.केंद्र, कवठा ता.रिसोड येथील नियमीत पाणी पुरवठा होण्याबाबत व्यवस्था करण्यात यावी. ब्लिचींग पावडर चांगल्याप्रतीचेच खरेदी करण्यात यावे. व पाण्याचा साठा घरामध्ये जास्त दिवस ठेऊ नये डेंगु होण्याची शक्यता असते. असा सुचना सर्व गविअ व वि.अ.पं.यांना जिल्हा आरोग्य अधिकारी व मा.मु.का.अ.यांनी दिल्या. |
| २१ | **अ.जा.अ.ज. घटकाचा विकास करणे योजना व तांडा वस्ती सुधार योजना कामाचा आढावा** | **पंचायत समिती, वाशिम, मालेगांव, मंगरुळपीर, रिसोड , मानोरा व कारंजा**<br>अ.जा.अ.ज. घटकाचा विकास करणे योजना व तांडा वस्ती सुधार योजनेतील अखर्चीत रक्कम पं.स.ने जि.प.ला त्वरीत परत करावी व अपुर्ण कामे पुर्ण करावे अशा सुचना मा.मु.का.अ.यांनी दिल्यात |
| २२. | **मा.मु.का.अ.यांनी आढावा सभेत दिलेलेल्या महत्वाच्या सुचना** | १. सर्व शिक्षकांचे पगाराचे बॅक खाते राष्ट्रीयकृत बँकेत काढण्यात यावे.<br>२. ग्रा.पं.चे सर्वच बॅक खाते राष्ट्रीयकृत बँकेत काढण्यात यावे. |

उपरोक्त प्रमाणे विषय निहाय आढावा घेण्यात आला असून सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत, आरोग्य , तालुका स्तरीय BRC-CRC, महा.गांधी रा.ग्रा.रो.ह. योजनेचे तालुकास्तरीय APO तसेच आपले सरकार सेवा केंद्राचे तालुका व्यवस्थापक यांनी प्रलंबीत सर्व कामे दिलेल्या मुदतील पुर्ण करणे बाबत सुचित करुन सभा संपल्याचे सुचित केले.

१२/०६/२०

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं)
जिल्हा परिषद, वाशिम

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, वाशिम

**जा.क्र./जिप/साप्रवि/पंचा/विअसनो/ 9402 /२०२०**
**कार्यालय, जिल्हा परिषद वाशिम**
**दिनांक :- 12 /०६/२०२०.**

**प्रति,**

१) खाते प्रमुख, ---------------- जि.प.वाशिम यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.

२) गट विकास अधिकारी पंचायत समिती, ---------------- (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.

Scanned with CamScanner